# शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित,

**CIN : 70200MH1998SGC116664**

५ वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू), मुंबई - ४०० ०५१.

**संगणक विषयक टोनर/काट्रेज इत्यादींचा पुरवठा व रिफिलींग करण्यासाठी दरपत्रक मागविणेबाबत.**

## नोटीस

क्रमांक : शिपुप्रम/व्य(प्रशा)/ले.सा./ ४०१ /२०१७, दिनांक : ६ एप्रिल, २०१७.

शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या कार्यालयास दि. ३० एप्रिल, २०१८ पर्यंत गरज भासेल त्याप्रमाणे, खाली नमूद केलेल्या विवरणपत्रातील विशिष्ट नमूद केलेल्या **मूळ कंपनीचेच** संगणक विषयक टोनर/काट्रेज इत्यादी पुरविण्याकरीता व रिफिलींगसाठी सर्वात कमी दर पुढे नमूद केलेल्या विशिष्ट अटी व शर्तींच्या अधिनस्त सोबतच्या विहित अर्जाच्या नमुन्यात दि. १९ एप्रिल, २०१७ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत मागविण्यात येत आहेत.

### विवरणपत्र

संगणक विषयक टोनर/काट्रेजची यादी

| अ.क्र. | कंपनीचे नाव व क्रमांक | अंदाजे वार्षिक गरज * |
|---|---|---|
| I | II | III |
| १ | कॅनन टोनर ३०३ | ४ ते ७ |
| २ | ब्लॅक ८०२ (एचपी) | २ ते ५ |
| ३ | कलर ८०२ (एचपी) | २ ते ५ |
| ४ | एच.पी. काट्रेज ८८ A | ४ ते ७ |
| ५ | एच.पी. १२ अे | ९ ते १४ |
| ६ | एच.पी. १५१० | ४ ते ७ |
| ७ | सॅमसंग प्रिंटर M2876ND करीता ब्लॅक टोनर | ४ ते ७ |
| ८ | एच. पी. ६८० (कलर) | ७ ते १२ |
| ९ | एच.पी. ६८० (ब्लॅक) | ७ ते १२ |

*** टिप :** वरील विवरणापत्रातील रकाना III मध्ये दर्शविण्यात आलेली वार्षिक गरज ही अंदाजे संख्या आहे. प्रत्यक्षात कार्यालयाला गरज भासेल त्याप्रमाणे निवड एजन्सीला कळविण्यात येईल.

**सूचना :** दरामध्ये, तसेच दरपत्रकाच्या कागदपत्रात कोठेही खाडाखोड, ओव्हररायटींग (गिरवणे), पांढरी शाई लावणे टाळावे. तथापि, अपरिहार्य कारणास्तव, तसे करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी. तसे न केल्यास दरपत्रक रद्द करण्याचे अधिकार मा. व्यवस्थापकीय संचालक/शिपुप्रम यांच्याकडे राखून ठेवले आहेत.

**संगणक विषयक टोनर/काट्रेज इत्यादी पुरविण्याकरीता व रिफिलींग करण्यासाठी विहित करण्यात आलेल्या अटी/शर्ती आणि निवडीचे निकष व पध्दत खाली नमूद केल्याप्रमाणे आहेत.**

**<u>अटी, शर्ती, निवडीचे निकष व पध्दत :</u>**

१. शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या (शिपुप्रम) संगणक विषयक टोनर/काट्रेज इत्यादी पुरविण्याकरीता व रिफिलींगसाठी निविदा सादर करणाऱ्या एजन्सीने संपूर्ण माहिती नमूद करुन तसेच अटी व शर्ती मान्य असल्याबद्दल सोबतच्या विहित नमुन्यातील अर्ज/दरपत्रकात स्वत: पुरवठादाराने नावासह सही करणे आवश्यक आहे.

२. पुरवठादाराने दरपत्रकानुसार विहित वेळेत संगणक विषयक टोनर/काट्रेज इत्यादीचा पुरवठा करणे व रिफिलींग करुन देणे बंधनकारक असल्याचे सोबतच्या विहित नमुन्यातील दर अर्ज/पत्रकात स्वाक्षरीसह नमूद करणे, बंधनकारक आहे.

३. संगणक विषयक टोनर/काट्रेज इत्यादी शक्य असेल त्या मर्यादेपर्यंत ब्रॅन्डेड (Branded)/भारतीय मानक ब्यूरो (ISI) दर्जाच्या साहित्य/सामुग्रीच्या स्पर्धात्मक दरांची तुलना करुन, विविध दरपत्रकातील केवळ सर्वात कमी दर आढळणाऱ्या संगणक विषयक टोनर/काट्रेज इत्यादींचे तसेच रिफिलींगचे त्या-त्या विशिष्ट पुरवठादाराचे दर सर्वसाधारणपणे स्विकारण्यात येतील.

४. केवळ आस्थापना/दुकाने अधिनियम लायसन्स, वॅट, सेवाकर नोंदणी प्रमाणपत्र व आयकर क्रमांक/पॅनकार्ड धारक पुरवठादारानेच दर सादर करावेत. सदरहू सर्व परवाने वॅट, सेवाकर प्रमाणपत्र व पॅनकार्डची स्वयं-साक्षांकित प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा त्या पुरवठादाराचे दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही, व ते दरपत्रक अनर्ह (disqualified) समजण्यात येईल. दरपत्रकावर स्वत: पुरवठादाराची सही व शिक्का असणे बंधनकारक आहे. अन्य व्यक्तींनी सही केलेले दरपत्रक ग्राह्य समजले जाणार नाही व ते विचारात घेतले जाणार नाही.

५. दरपत्रकामध्ये नमूद केलेले दर हे सर्व करांसहीत नमूद केलेले असावेत.

६. दरपत्रकामध्ये नमूद करण्यात आलेले दर स्विकारण्यात आल्यास ते दर, कराराच्या दिनांकापासून पुढील १ वर्षाच्या कालावधी पर्यंत अस्तित्वात राहतील. सदरहू १ वर्षाच्या कालावधीमध्ये संगणक विषयक टोनर/काट्रेज इत्यादींच्या व रिफिलींगच्या दरामध्ये कोणत्याही कारणामुळे दरवाढ झाली तरी पुरवठादारास दरपत्रकात सादर केलेल्या दरामध्ये कोणत्याही प्रकारे दरवाढ देण्यात येणार नाही.

७. पुरवठा आदेश निर्गमित केल्यानंतर मागणी केलेल्या संगणक विषयक टोनर/काट्रेज इत्यादींचा पुरवठा मागणीनुसार (त्या विशिष्ट कंपनीचा) तात्काळ करणे तसेच वेळोवेळी रिफिलींग करुन देणे पुरवठादारावर बंधनकारक राहील.

८. उपरोक्त १ वर्षाचा करार संपल्यावर पुढील दर प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत, तथापि जास्तीत-जास्त १ महिन्यापर्यंत पुरवठादाराला त्यांनी मान्य केलेल्या दराने संगणक विषयक टोनर/काट्रेज इत्यादींचा पुरवठा करणे व रिफिलींग करणे बंधनकारक राहील.

९. शिपुप्रमने दर स्विकृत केल्यावर त्या संगणक विषयक टोनर/काट्रेज इत्यादीची गरज भासल्यास त्या वस्तूंची रितसर पत्राद्वारे मागणी कळविण्यात येईल व केवळ त्या व तितक्याच वस्तूंचा पुरवठा करणे आवश्यक राहील. तसेच रिफिलींगची आवश्यकता भासल्यास रितसर पत्राद्वारे कळविण्यात येईल व सदर टोनर/काट्रेज रिफिलींग करुन देणे आवश्यक राहील.

१०. संगणक विषयक टोनर/काट्रेज इत्यादींचा पुरवठा केल्यानंतर तसेच रिफिलींग करुन दिल्यानंतर त्यासंबंधीची देयके आगाऊ मुद्रांक पावतीसहीत सादर करावीत. देयके प्राप्त झाल्यापासून साधारणत: १५ दिवसात बिलाची रक्कम ECS सेवेद्वारे परस्पर खात्यात जमा करण्यात येईल. त्यासाठी लेखाधिकारी/शिपुप्रम, यांच्याकडे बँक खात्याचा तपशील सादर करणे आवश्यक राहील. प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास साधारणपणे १ महिन्यापर्यंत कालावधी लागल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

११. पुरवठादाराची सेवा अत्यंत समाधानकारक असल्याचे दिसून आल्यास सदर सेवा आणखी १ वर्षाकरीता वाढविण्याचे अधिकार शिपुप्रम राखून ठेवत आहेत.

१२. दरपत्रक सादर करताना मोहोरबंद लिफाफ्यात सादर करावेत. त्या लिफाफ्यावर **" संगणक विषयक टोनर/काट्रेज इत्यादींचा पुरवठा व रिफिलींग करण्याबाबत दरपत्रक"** असे लिहावे. अन्यथा दरपत्रक स्विकारले जाणार नाही.

१३. **दर पत्रक भरुन सादर करण्याचे ठिकाण व मुदत** : शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित, ५ वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू), मुंबई - ४०० ०५१ येथे दि. १९ एप्रिल, २०१७ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत दरपत्रक बंद लिफाफ्यात जमा करावे. त्यानंतर आलेले दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.

१४. प्राप्त लिफाफाबंद दरपत्रके त्याच दिवशी दि. १९ एप्रिल, २०१७ रोजी सायं. ४.०० वाजता शिपुप्रमच्या कार्यालयाच्या दालनात उघडण्यात येतील. संबंधित दरपत्रकधारक किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांनी सदर वेळी उपस्थित रहावे.

१५. शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित, मुंबई - ४०० ०५१ हे कोणतीही एक अथवा सर्व दरपत्रकांची संपूर्ण प्रक्रिया पूर्णपणे किंवा दरपत्रक कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवीत आहे.

१६. दरपत्रकधारक बृहन्मुंबई कार्यक्षेत्रातील पुरवठाधारक असावा.

व्यवस्थापक (प्रशा)
शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

***********

**अर्ज/दरपत्रकाचा नमुना**

प्रति,

व्यवस्थापकीय संचालक,
शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

**विषय :- शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित (शिपुप्रम) च्या कार्यालयास संगणक विषयक टोनर/काट्रेज इत्यादींचा पुरवठा व रिफिलींग करण्यासाठी पुरवठादाराची निवड करणे.**

महोदय,

| अ.क्र. | विषय | पुरवठादाराची माहिती |
|---|---|---|
| १ | संगणक विषयक टोनर/काट्रेज इत्यादींचा पुरवठा व रिफिलींग करणाऱ्या पुरवठादाराचे नांव | |
| | अ) संपूर्ण पोस्टल पत्ता | अ) |
| | ब) कार्यालयाचा दुरध्वनी क्रमांक | ब) |
| | क) पुरवठादाराचा मोबाईल क्रमांक<br>दुरध्वनी क्रमांक | क) |
| | ड) पुरवठादाराच्या अधिकृत प्रतिनिधीचा मोबाईल क्र. | ड) |
| | इ) फॅक्स क्रमांक | इ) |
| | ई) ई-मेल आयडी | ई) |

२. मी, संगणक विषयक टोनर/काट्रेज इत्यादींचा अधिकृत पुरवठादार आहे. शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितला पुढील १ वर्षाच्या कालावधीकरीता खाली नमूद केलेल्या दराप्रमाणे संगणक विषयक टोनर/काट्रेज इत्यादी पुरवठा व रिफिलींग करण्याकरीता मी इच्छुक आहे.

**परिशिष्ट**

संगणक विषयक टोनर/काट्रेजची यादी

| अनु. | कंपनीचे नाव व क्रमांक | नग/संख्या | किंमत | रिफिलींगचे दर |
|---|---|---|---|---|
| १ | कॅनन टोनर ३०३ | | | |
| २ | ब्लॅक ८०२ (एचपी) | | | |
| ३ | कलर ८०२ (एचपी) | | | |
| ४ | एच.पी. काट्रेज ९२० | | | |
| ५ | एच.पी. १२ अे | | | |
| ६ | काट्रेज १०३/३०३/७०३ कॅनन | | | |
| ७ | सॅमसंग प्रिंटर M2876NDकरीता ब्लॅक टोनर | | | |
| ८ | एच. पी. ६८० (कलर) | | | |
| ९ | एच.पी. ६८० (ब्लॅड) | | | |

३. मी, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितची दि. ६ एप्रिल, २०१७ ची संगणक विषयक टोनर/काट्रेज इत्यादींचा पुरवठा व रिफिलींग करण्याबाबतची नोटीस व सोबतची जोडपत्रे व त्यातील शर्ती/अटी वाचल्या असून त्या मला समजल्या आहेत, व त्या सर्व शर्ती, अटी निवडीचे निकष व पध्दती मला मान्य आहेत. त्यानुसार माझ्या उपरोक्त अर्ज/दरपत्रकातील माहितीच्या पुष्ठ्यर्थ आवश्यक असणारी सर्व कागदपत्रे मी जोडली आहेत. माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे वरील अर्जात व दरपत्रकात दिलेली माहिती सत्य व अचूक आहे. मी पुढे बिनशर्त असे मान्य करतो की, वरील अर्जात नमूद केलेली माहिती चूकीची असल्याचे आढळल्यास शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित या कंपनीकडून अन्य कोणतीही कार्यवाही करण्यासह माझ्या समवेत/आमच्या एजन्सी समवेतचा करार/ठरलेल्या बाबी रद्द समजण्यात येतील, याची मला माहिती आहे.

४.	मी/आम्ही याद्वारे मान्य करतो की, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितने (शिपुप्रम) माझी/एजन्सीचे दरपत्रक स्विकारल्यावर माझी/आमची एजन्सी शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या संदर्भांकित दि. ६ एप्रिल, २०१७ च्या नोटीसमधील व त्या सोबतच्या जोडपत्रातील शर्ती/अटींची पूर्तता करु न शकल्यास माझ्या समवेत अथवा आमची एजन्सी व शिपुप्रममध्ये झालेला करार/ठरलेल्या बाबी संपुष्टात येतील.

५.	मी/आम्ही सादर केलेला सदरहू वित्तीय निविदा/देकार उघडल्याच्या दिनांकापासून ९० दिवसांकरीता वैध/ग्राहय राहील व दरपत्रक अथवा दरपत्रकातील ज्या काही वस्तुंचे दर शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितकडून स्विकारले जातील, त्या दराने कराराच्या दिनांकापासून पुढील १ वर्ष पर्यंतच्या कालावधीसाठी पुरवठा करणे माझ्यावर/आमच्या एजन्सीवर बंधनकारक राहील.

**आपला,**

**(नाव:-                    )**
**संगणक विषयक टोनर/काट्रेज इत्यादींचा**
**पुरवठा व रिफिलींग करणाऱ्या**
**पुरवठादारचे नाव व स्वाक्षरी**
**(कार्यालयाचा शिक्का)**

**दिनांक :-     /     /२०१७.**